# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO


---

**(असाधारण)**

**रविवार, दिनांक २९/०६/२०२५**

## अधिसुचना

क्रमांक :- ८६/२०२५ दिनांक :- २९/०६/२०२५

**विषय :- अधिसुचना क्र. ७७/२०२४ दि. १२.०७.२०२४ नुसार विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारे शुल्क संबंधित निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये दुरुस्ती करण्याबाबत...**

संदर्भ :- १) अधिसुचना क्र. ७७/२०२४ दि. १२.०७.२०२४
२) शासनाचे पत्र क्र. बैठक – २०२५/ प्र. क्र.स ४१/तांशि – ४, दि. २० मे, २०२५

ज्याअर्थी, उपरोक्त अधिसुचनेनुसार सत्र २०२४-२०२५ पासुन विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत अधिसुचित करण्यात आले आहे.

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त अधिसुचनेतील Appendix-B (unaided courses) या अंतर्गत नमुद बी.बी.ए व बी.सी.ए या अभ्यासक्रमाचा AICTE अंतर्गत समावेश आहे.

आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. बैठक – २०२५/ प्र. क्र.स ४१/तांशि – ४, दि. २० मे, २०२५ च्या पत्रान्वये बी.बी.ए., बी.सी.ए. अभ्यासक्रमांचा AICTE अंतर्गत समावेश झाल्यामुळे विद्यापीठाला शुल्क निश्चित करुन सादर करावयाचे निर्देश दिले आहेत.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १०१ (७) अंतर्गत कार्यवाही करुन मा. अधिष्ठाता मंडळामार्फत शुल्क निश्चिती समितीमार्फत, शुल्क व इतर शुल्क ठरविण्यात आले आहे व विद्या परिषदेला शिफारस केली आहे. शासनाला तातडीने कळवायचे असल्यामुळे विद्या परिषदेच्या वतीने कलम ३३ (१) (e) अंतर्गत सदर शुल्कास मान्यता देण्यात आली आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना अधिसुचित करण्यात येते की, उपरोक्त अधिसुचनेमध्ये असलेले Appendix-B मध्ये (unaided courses) बी.बी.ए., बी.सी.ए. या अभ्यासक्रचे रकाना क्र. ४ मध्ये (fee for courses) नुसार असलेले शुल्क अनु. क्र. १, ३, ५, १० मध्ये असलेले शुल्कामध्ये खालीलप्रमाणे बदल करुन तसे शुल्क सत्र २०२५-२०२६ करीता आकारण्यात येईल.

| अनु.क्र. | Item/Head | Present Fee | ऐवजी | B.C.A. | B.B.A. |
|---|---|---|---|---|---|
| **1.** | **Tution Fee** | **Rs. 6000/-** | **ऐवजी** | **Rs. 27,500/-** | **Rs. 23,500/-** |
| **3.** | **Laboratory Fee** | **Rs. 5280/- (BCA)**<br>**Rs. 1760/- (BBA)** | **ऐवजी** | **Rs. 6100/-** | **Rs. 4100/-** |
| **5.** | **Library Fee** | **Rs. 1760/-** | **ऐवजी** | **Rs. 2025/-** | **Rs.2025/-(15% increase)** |
| **10.** | **Excursion/Industrial Tour/Field visit.** | **Rs. 110/-** | **ऐवजी** | **Rs. 1500/-** | **Rs. 1500/-** |

उपरोक्त शुल्क शासनाला संक्रमण कालावधीकरीता व जोपर्यंत शासन स्तरावर (FRAकडून) सदर शुल्क निश्चिती होत नाही तोपर्यंत उपरोक्त शुल्क हे शासन मान्यतेच्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

स्वा/-
(डॉ.अविनाश असनारे)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ